मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» मंगळवार, दि. 31 मार्च 2026 | पान- 1

# शेवटच्या टप्प्यात महापालिकेची विक्रमी कर वसुली

## अभय योजनेतुन 29 दिवसांत 157 कोटींची विक्रमी वसुली, 31 मार्च 2026 पर्यंत योजनेचा कालावधी




> अभय योजना ही नागरिकांना दिलासा देणारी आणि महापालिकेच्या आर्थिक शिस्तीस बळकटी देणारी योजना ठरली आहे. पिंपरी चिंचवडकरांनी दाखवलेला प्रतिसाद हा शहराच्या विकासाबाबतच्या बांधिलकीचा पुरावा आहे. उर्वरित थकबाकीदारांनीही शेवटच्या दिवशी पुढाकार घेऊन या संधीचा लाभ घ्यावा.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**

> अभय योजनेमुळे कर वसुलीत लक्षणीय वाढ झाली असून, थकबाकीदारांना दिलासा देण्याचा उद्देश साध्य होत आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कर भरणे ही सकारात्मक बाब आहे नागरिकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, कोणत्याही अडचणीशिवाय नागरिकांनी कर भरावा.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेचा २९ मार्च २०२६ पर्यंत ५५ हजार ७११ थकबाकीदारांनी लाभ घेतला आहे. ही योजना लागू झाल्यापासून म्हणजेच १ मार्च २०२६ पासून २९ मार्च २०२६ या २९ दिवसांमध्ये तब्बल १५७ कोटी २१ लाख ५३ हजार रुपयांचा मालमत्ता कर वसूल झाला आहे. अभय योजनेचा कालावधी हा ३१ मार्च २०२६ रोजी संपणार असून, ज्या थकबाकीदारांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही त्यांनी तो ३१ मार्च २०२६ पूर्वी भरून अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने थकबाकीदार मालमत्ताधारकांना दिलासा देण्यासाठी १ मार्च २०२६ पासून अभय योजना लागू करण्यात आली. या योजनेंतर्गत विलंब दंडावर ९० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे अनेक थकबाकीदार नागरिकांनी पुढाकार घेत थकबाकी भरून अभय योजनेचा लाभ घेतला आहे. नागरिकांच्या या सकारात्मक प्रतिसादामुळे कर वसुलीत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

गेल्या २९ दिवसांमध्ये आतापर्यंत एकूण ६८ हजार ४८८ मालमत्ताधारकांनी १५७ कोटी २१ लाख ५३ हजार रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे. यापैकी ५५ हजार ७३१ थकबाकीदारांनी अभय योजनेचा लाभ घेतला असून, त्यांना एकूण ३८ कोटी ८१ लाख रुपयांची दंडावरील सवलत देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, महापालिकेच्या महसुलातही लक्षणीय वाढ झाली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी आता केवळ एकच दिवस शिल्लक राहिला असून, ३१ मार्च २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ही योजना लागू राहणार आहे. त्यामुळे अद्यापही मालमत्ता कर थकबाकी असलेल्या नागरिकांनी या अंतिम संधीचा लाभ घेऊन आपली थकबाकी तत्काळ भरावी, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत असून, मालमत्तेच्या ठिकाणी समक्ष भेट देऊन कर भरण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच ऑनलाइन पेमेंट, धनादेशाद्वारे भरणा आणि कॅश काउंटर अशा विविध माध्यमांद्वारे कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेवटच्या दिवशी नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागीय कर संकलन कार्यालयांचे कॅश काउंटर ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते रात्री १० पर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहेत.

---

# सेवानिवृत्त होत असलेल्या महापालिका कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे: सह आयुक्त मनोज लोणकर

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून माहे मार्च 2026 अखेर एकूण 26 कर्मचारी सेवानिवृत्त



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यात सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. कोणत्याही पदावर कार्य केले असले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याचा अनुभव, त्यांची कार्यनिष्ठा आणि जबाबदारीची जाणीव यामुळेच महापालिकेला आज नावलौकिक प्राप्त झाला आहे. सेवानिवृत्ती हा शेवट नसून आयुष्याचा एक नवा टप्पा आहे. या काळात आपण आपल्या कुटुंबियांसोबत अधिक वेळ घालवावा, आरोग्याची काळजी घ्यावी आणि आपल्या आवडी-निवडी, छंद जोपासत आनंदी व समाधानकारक आयुष्य जगावे, असे प्रतिपादन सह आयुक्त मनोज लोणकर यांनी केले

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात माहे मार्च २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या २३ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ३ अशा एकूण २६ कर्मचाऱ्यांचा सह आयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता राजेंद्र वाबळे, उप आयुक्त संदीप खोत, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य लिपिक माया वाकडे तसेच सेवानिवृत्त कर्मचारी आणि त्यांचे कुटूंबीय उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले तर सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेची रंगत

## देशभरातून खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग; 63व्या महापौर चषकासाठी जोरदार स्पर्धा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन व महाराष्ट्र बॉडी बिल्डर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पिंपरी चिंचवड अमॅच्युअर बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या सहकार्याने 'महापौर चषक ६३ वी राष्ट्रीय अजिंक्यपद व ६३ वी ज्युनियर शरीरसौष्ठव स्पर्धा २०२६'या राष्ट्रीय स्तरावरील भव्य स्पर्धेला देशभरातील खेळाडूंचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणाऱ्या या स्पर्धेत विविध राज्यांमधून ४४५ पुरुष व ५० महिला खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे ही भव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या स्पर्धेत राष्ट्रीय दर्जाच्या या स्पर्धेत ज्युनियर व वरिष्ठ गटातील विविध वजनी प्रकारांमध्ये शरीरसौष्ठव, क्लासिक, फिजीक व फिटनेस प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. खेळाडूंकडून उत्कृष्ट शारीरिक बांधा, सादरीकरण कौशल्य, शिस्तबद्ध तयारी आणि कठोर परिश्रम यांचे प्रभावी प्रदर्शन केले जात आहे. परीक्षकांच्या उपस्थितीत प्राथमिक फेऱ्या, उपांत्य व अंतिम फेऱ्या नियोजनबद्ध पद्धतीने पार पडत असून स्पर्धेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे.



या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांना राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंची कामगिरी प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळत आहे. महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत स्पर्धेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले असून खेळाडू, प्रशिक्षक व प्रेक्षकांसाठी आवश्यक सुविधा, निवास व तांत्रिक व्यवस्थेची योग्य तयारी करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहराची क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठा अधिक उंचावली जात आहे.

### स्पर्धेचा २९ मार्च २०२६ रोजीचा निकाल

**» ज्युनियर पुरुष फिजीक (१७१ सेमी पर्यंत)**
१) आकाश दडमल – महाराष्ट्र
२) जय नवगिरे – महाराष्ट्र
३) अभिषेक सिंग – मणिपूर
४) सरोज मनीष – गुजरात
५) भावेश – गोवा
६) मौसुम गोगोई – आसाम

**» ज्युनियर पुरुष फिजीक (१७५ सेमी पर्यंत)**
१) जिंटू कर – आसाम
२) समाधान निसाळ – महाराष्ट्र
३) सुशांत जाधव – महाराष्ट्र
४) संग्राम राऊत – ओडिशा
५) भूपेंद्र वर्मा – महाराष्ट्र
६) सचिन सिंग – उत्तर प्रदेश

**» ज्युनियर पुरुष फिजीक (१८० सेमीपेक्षा कमी)**
१) निलेश गुरव – महाराष्ट्र
२) मयूर शिंदे – महाराष्ट्र
३) अंकुर चौधरी – आसाम
४) गौरव ठाकरे – महाराष्ट्र
५) मोहम्मद इब्राहिम – पुदुचेरी

**» ज्युनियर पुरुष फिजीक (१८० सेमीपेक्षा जास्त)**
१) स्वागतम पाटील – महाराष्ट्र
२) दीपक साहू – ओडिशा
३) जयिश परदेशी – महाराष्ट्र
४) एमडी रिझवान – ओडिशा
५) लशाश महावंशी – गुजरात

### स्पर्धेचा २९ मार्च २०२६ रोजीचा निकाल

**» ज्युनियर पुरुष क्लासिक (१७१ सेमी पर्यंत)**
१) शुभम वीर – महाराष्ट्र
२) चंदन दास – ओडिशा
३) अर्पण सपकाळ – महाराष्ट्र
४) अनिल सामंत्राय – ओडिशा
५) साहिल सावंत – महाराष्ट्र
६) पिंटू सरकार – पश्चिम बंगाल

**» ज्युनियर पुरुष क्लासिक (१७५ सेमी पर्यंत)**
१) दारीस दाबरे – महाराष्ट्र
२) आकाश तिवारी – महाराष्ट्र

**» ज्युनियर पुरुष क्लासिक (१८० सेमी पर्यंत)**
१) प्रणव पवार – महाराष्ट्र
२) हृषीकेश मेहर – महाराष्ट्र

**» पुरुष फिजिकल चॅलेंज (खुला गट)**
१) नितेश भंडारी – महाराष्ट्र
२) सुधीर मंकार – महाराष्ट्र
३) ई. सूर्यनारायण – तेलंगणा
४) कृष्णा बागुल – महाराष्ट्र
५) राजुभाई मारवडिया – गुजरात
६) श्रीरामचंद्रन – तेलंगणा

**» ज्युनियर महिला फिजीक (खुला गट)**
१) खुशी नांबियार – गोवा
२) रिद्धी पारकर – महाराष्ट्र

**» ज्युनियर महिला बॉडी फिटनेस (खुला गट)**
१) खुशी नांबियार – गोवा
२) आराध्या नायर – केरळ
३) लक्ष्मी हंसदाह – ओडिशा
४) वर्णा एम – केरळ
५) अनुस्मिता डेकराजा – आसाम
६) रिद्धी पारकर – महाराष्ट्र

**» पुरुष मास्टर्स (४० वर्षांवरील)**
१) कमलेश आचरा – महाराष्ट्र
२) मनोहर बोचरे – महाराष्ट्र
३) दत्ताराज नाईक – महाराष्ट्र
४) कोईरेम्बा सिंग – महाराष्ट्र
५) चिराग पाटील – महाराष्ट्र
६) बेर्नार्ड – केरळ

**» पुरुष मास्टर्स (५० वर्षांवरील)**
१) रवींद्र माने – नेव्ही
२) सुरेश ए – केरळ
३) मोमोटोम्बा सिंग – मणिपूर
४) सुदेश सापळे – महाराष्ट्र
५) प्रफुल्ल हळदणकर – महाराष्ट्र
६) पाओनाम मेइती – मणिपूर

### स्पर्धेचा २९ मार्च २०२६ रोजीचा निकाल

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ५५ किलो**
१) मनीष म्हात्रे – महाराष्ट्र
२) अक्षय – दिल्ली
३) संताणू मल्लीक – ओडिशा
४) सानू बेहेरा – ओडिशा
५) कैलास बिस्वाल – ओडिशा
६) विशाल खुडे – महाराष्ट्र

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ६० किलो**
१) अनिल सामंत्राय – ओडिशा
२) चंदन दास – ओडिशा
३) राहुल – दिल्ली
४) एस. लिखित – आंध्र प्रदेश
५) रोहन भोसले – महाराष्ट्र
६) सुमित परब – महाराष्ट्र

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ६५ किलो**
१) नवीन विश्वकर्मा – उत्तर प्रदेश
२) मंथन पाटील – महाराष्ट्र
४) सायला तलवार – गोवा
५) रघुनाथ मोहपात्रा – ओडिशा
६) विपुल राज – विदर्भ

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ७० किलो**
१) अर्पण सपकाळ – महाराष्ट्र
२) शुभम वीर – महाराष्ट्र
३) मयूर कोनवार – आसाम
४) प्रणव दास – केरळ
५) श्रीतेज जाधव – महाराष्ट्र
६) दारीस दाबरे – महाराष्ट्र

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ७५ किलो**
१) साहिल सावंत – महाराष्ट्र
२) फेबिन बैजू – केरळ
३) हरिंद्रनाथ आर – केरळ

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ८० किलो**
१) विशाल वसावा – गुजरात
२) शहनवाज कादरी – ओडिशा
३) हृषीकेश मेहर – महाराष्ट्र
४) शशिकांत यादव – राजस्थान
५) एल. कन्नन – पुदुचेरी

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ८० किलोपेक्षा जास्त**
१) कांतम कुमार – आंध्र प्रदेश
२) आयुष तांडेल– महाराष्ट्र
३) मिधुन सायमन – केरळ
४) रियान कोळी – महाराष्ट्र

**» ज्युनियर पुरुष बॉडीबिल्डिंग ५५ किलो**
१) मनीष म्हात्रे – महाराष्ट्र
२) अक्षय – दिल्ली
३) संताणू मल्लीक – ओडिशा
४) सानू बेहेरा – ओडिशा
५) कैलास बिस्वाल – ओडिशा
६) विशाल खुडे – महाराष्ट्र

# फेरीवाल्यांनाच्या खिशाला कात्री लागणार?

## पथारी व्यवसायिकांवरील सेवाशुल्क प्रस्ताव महापालिका प्रशासनाने फेटाळला

**पुणे | प्रतिनिधी**

पथारी व्यवसायिकांकडून झोपडपट्टीधारकांप्रमाणे सेवाशुल्क आकारणी करण्याच्या प्रस्तावाला महापालिका प्रशासनाने नकार दर्शवला आहे. बाजारमुल्यानुसार वार्षिक कर आकारणी करण्याची मागणीही प्रशासनाने फेटाळली आहे. प्रशासनाचा हा अभिप्राय स्थायी समितीने मंजूर केला आहे. राष्ट्रवादीच्या नगरसेविका नंदिनी धेंडे आणि हर्षल टिंगरे यांनी स्थायी समितीसमोर सेवाशुल्क आकारण्याचा प्रस्ताव मांडला होता.

पथारी व्यवसायिकांकडून श्रेणीनिहाय दररोज आकारल्या जाणाऱ्या शुल्काऐवजी बाजारमुल्यानुसार वार्षिक कर आकारावा, तसेच झोपडपट्टीधारकांप्रमाणे सेवाशुल्क लागू करावे, अशी त्यांची मागणी होती. प्रस्तावानुसार, महापालिका हद्दीत सुमारे १२,५०० अधिकृत पथारी व्यावसायिक असून त्यापैकी सुमारे १९०० जणांकडून कोणताही कर भरला जात नाही. या व्यावसायिकांकडे ४० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले होते.




### सवलती आणि पुढील उपाययोजना

» प्रशासनाच्या मते, १ एप्रिल २०१८ पासून पथारी व्यवसायिकांच्या दैनंदिन शुल्कात ५० टक्के कपात करण्यात आली आहे. याशिवाय दिव्यांग व्यवसायिकांना आणखी २५ टक्के सवलत दिली जाते. अशा परिस्थितीत नवीन करप्रणाली लागू केल्यास महसुलात घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे सध्याची शुल्करचना कायम ठेवत नोंदणी व नूतनीकरणावर भर दिला जाणार आहे. भविष्यात महसूल वाढवण्यासाठी आणि पारदर्शकता राखण्यासाठी प्रशासन अधिक प्रभावी उपाययोजना करणार असल्याचे संकेत दिले आहेत.

थकबाकी वसुलीसाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत देण्यात यावी, दंड माफ करावा, तसेच कर न भरणाऱ्यांचे परवाने रद्द करावेत, अशीही मागणी प्रस्तावात केली होती. यावर प्रशासनाने दिलेल्या अभिप्रायात १२,१५८ नोंदणीकृत फेरीवाल्यांपैकी १८५० जणांनी २०१८ पासून कोणताही कर भरलेला नसल्याची वस्तुस्थिती मान्य केली आहे.

या सर्वांचे नूतनीकरण मार्च २०२६ अखेरपर्यंत पूर्ण केले जाणार असून, नूतनीकरण न करणाऱ्यांची संख्या कमी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशासनाच्या मते, दैनंदिन शुल्कात १ एप्रिल २०१८ पासून ५० टक्के कपात करण्यात आली आहे. दिव्यांग फेरीवाल्यांना या कमी दरात आणखी २५ टक्के सवलत दिली जाते.

अशा परिस्थितीत बाजारमूल्य किंवा झोपडपट्टी सेवाशुल्काच्या धर्तीवर कर आकारणी केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात घट होऊन आर्थिक तुट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे असा निर्णय घेणे उचित नसल्याचे प्रशासनाने नमूद केले होते. स्थायी समिती प्रशासनाचा अभिप्राय मान्य करत सवलतीची मागणी अप्रत्यक्षपणे फेटाळून लावली आहे.

### करप्रस्तावावर प्रशासनाचा नकार

» पथारी व्यवसायिकांकडून झोपडपट्टीधारकांप्रमाणे सेवाशुल्क किंवा बाजारमूल्यानुसार वार्षिक कर आकारणी करण्याच्या प्रस्तावाला महापालिका प्रशासनाने नकार दिला आहे. या प्रस्तावामुळे लघु व्यावसायिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता होती. प्रशासनाने स्पष्ट केले की, पथारी व्यवसायिकांचे उत्पन्न अनिश्चित आणि तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने अशा प्रकारची कर आकारणी योग्य ठरणार नाही. स्थायी समितीनेही प्रशासनाचा अभिप्राय मान्य करत प्रस्ताव फेटाळला आहे. या निर्णयामुळे शहरातील हजारो पथारी व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.

### थकबाकीचा प्रश्न कायम

» महापालिका हद्दीत सुमारे १२,५०० पथारी व्यवसायिक नोंदणीकृत असून त्यापैकी अनेकांनी कर थकवला आहे. सुमारे १८५० व्यवसायिकांनी २०१८ पासून कोणताही कर भरलेला नसल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे. यामुळे महापालिकेच्या महसुलावर परिणाम होत आहे. थकबाकी वसुलीसाठी मुदतवाढ, दंडमाफी आणि परवाने रद्द करण्याच्या मागण्या प्रस्तावात करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रशासनाने करप्रणाली बदलण्याऐवजी नोंदणी आणि नूतनीकरण प्रक्रियेद्वारे थकबाकी वसुलीवर भर देण्याचा निर्णय घेतला आहे.

# पुणे पीएमआरडीए राज्यात तिसरी; मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते झाला गौरव...

## ई-गव्हर्नन्स; प्रशासकीय कामात ई-ऑफिस, 'एआय' आणि 'ब्लॉकचेन'चा प्रभावी वापर

**पुणे | प्रतिनिधी**

प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी राज्य सरकारने राबविलेल्या '१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात' पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) घवघवीत यश संपादन केले आहे. या मोहिमेत पुणे विभागात प्रथम, तर संपूर्ण राज्यात तृतीय क्रमांक पटकावत 'पीएमआरडीए' ने आपल्या कार्यक्षमतेची मोहोर उमटवली आहे. मुंबईत आयोजित विशेष सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'पीएमआरडीए'चा गौरव करण्यात आला.

राज्य शासनाने जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील शासकीय कार्यालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली होती. याअंतर्गत राज्यातील ९७ महामंडळे, प्राधिकरणे आणि शासकीय संस्थांचे कडक निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने सात तांत्रिक घटकांचा विचार करण्यात आला होता. कार्यालयाचे अद्ययावत संकेतस्थळ, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट यांसह कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि भौगोलिक माहिती प्रणाली यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा प्रशासनात अंतर्भाव करण्यावर 'पीएमआरडीए'ने भर दिला.

तत्कालीन महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला आणि त्यांच्या अधिकारीवर्गाने या सुधारणांची प्रभावी अंमलबजावणी केली. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पीएमआरडीएला प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ. योगेश म्हसे यांनी हे प्रशस्तिपत्र स्वीकारले. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी राज्य सरकारने राबविलेल्या '१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात' पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) घवघवीत यश संपादन केले आहे.



### तंत्रज्ञानाचा सर्वसामान्यांना फायदा

» या यशामुळे 'पीएमआरडीए'च्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि सुसूत्रता आली आहे. विशेषतः 'एआय' आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानामुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा अधिक वेगवान आणि डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाल्या आहेत. प्रशासकीय दिरंगाईला फाटा देऊन तंत्रज्ञानाद्वारे कामे सुलभ केल्याबद्दल 'पीएमआरडीए'चे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आता मागेल त्याला ‘पीएनजी’! उद्योगमंत्र्यांची मोठी घोषणा

## पीएनजी जोडणी तातडीने देण्याची मोहीम हाती घेण्यात आल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली.

**पुणे | प्रतिनिधी**

द्रवरूप नैसर्गिक वायूच्या (एलपीजी) टंचाईमुळे उद्योगांचा गॅस सिलिंडर पुरवठा बंद आहे. याचा मोठा फटका उद्योगांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगांनी मागणी केल्यास वाहिनीद्वारे नैसर्गिक वायूची (पीएनजी) जोडणी तातडीने देण्याची मोहीम हाती घेण्यात आल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. यासाठी सर्व सरकारी विभागांनी समन्वय साधून विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील उद्योगांची आढावा बैठक उद्योगमंत्री सामंत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतली. या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अतिरिक्त जिल्हाधिकारी सतीश राऊत, अतिरिक्त पोलीस आयुक्त रंजन शर्मा, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष भिसे व मुख्य अभियंता कैलास भांडेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर आणि विविध उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, सध्याच्या युद्धाच्या परिस्थितीत उद्योगांची उत्पादन क्षमता कायम राखणे ही राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. नैसर्गिक गॅस हा उद्योगांसाठी स्वस्त, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक ऊर्जास्रोत असल्याने कोणत्याही उद्योगाला केवळ गॅस जोडणीअभावी अडथळे निर्माण होऊ नयेत. त्यामुळे एमआयडीसी, गॅस वितरण कंपन्या आणि जिल्हा प्रशासन यांनी एकत्रितपणे नियोजन करून प्रत्येक पात्र उद्योगापर्यंत पीएनजी जोडणी पोहोचवावी.

उद्योगांसाठी पीएनजी जोडणीसाठी मोहीम सुरू करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हानिहाय व औद्योगिक वसाहतीनिहाय विशेष शिबिरे आयोजित करून अर्ज प्रक्रिया सुलभ करणे, तांत्रिक तपासणी जलद गतीने पूर्ण करणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे यावर भर दिला जाणार आहे. व्यवसायस्नेही वातावरणाच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे सामंत यांनी स्पष्ट केले.



### एलपीजी टंचाईचा उद्योगांवर परिणाम

**» द्रवरूप नैसर्गिक वायू (एलपीजी) टंचाईमुळे पुणे जिल्ह्यातील अनेक उद्योग अडचणीत आले आहेत. उत्पादनासाठी आवश्यक असलेला गॅसपुरवठा विस्कळीत झाल्याने उद्योगांची कार्यक्षमता घटत आहे. काही उद्योगांना उत्पादन कमी करावे लागत आहे, तर काही ठिकाणी कामकाजावर परिणाम होत आहे. जागतिक परिस्थिती, विशेषतः पश्चिम आशियातील युद्धामुळे इंधनपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे. उद्योगांच्या सातत्यपूर्ण उत्पादनासाठी स्थिर आणि विश्वासार्ह गॅसपुरवठा अत्यंत आवश्यक ठरत आहे.**

### काळाबाजार रोखण्यासाठी कडक उपाय

**» एलपीजी सिलिंडर पुरवठ्यात घरगुती ग्राहकांना प्राधान्य दिले जात असून, व्यावसायिक वापरासाठी पुरवठा मर्यादित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार केल्याच्या तक्रारी येत आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक कारवाईचा इशारा दिला आहे. अनियमितता आढळल्यास नागरिकांनी त्वरित ११२ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पारदर्शक पुरवठा व्यवस्था राखण्यासाठी प्रशासन सतर्क असून दोषींवर कठोर कारवाई केली जाणार आहे.**

### पीएनजी जोडणीसाठी विशेष मोहीम

**» उद्योगांना दिलासा देण्यासाठी सरकारने पाइपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) जोडणीची विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत औद्योगिक वसाहतींमध्ये शिबिरे घेऊन अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात येणार आहे. तांत्रिक तपासणी जलद गतीने पूर्ण करून प्रलंबित अर्ज निकाली काढण्यावर भर दिला जाणार आहे. एमआयडीसी, गॅस वितरण कंपन्या आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधून प्रत्येक पात्र उद्योगापर्यंत पीएनजी जोडणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

# जिल्हा परिषदेत ‘मलईदार’ पदांसाठी फिल्डिंग; कोणाची लागणार वर्णी

## कृषी, बांधकाम आणि समाजकल्याण या महत्त्वाच्या विभागांसाठी राष्ट्रवादीत जोरदार रस्सीखेच

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध पार पडल्यानंतर आता जिल्हा परिषद सदस्यांनी चार विभागांतील एकतरी सभापती पद पदरात पाडून घेण्यासाठी इच्छुकांनी फिल्डिंग लावली आहे. गुरुवार (दि. २) एप्रिल रोजी होणाऱ्या विषय समित्यांच्या सभापती निवडी होत असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा परिषदेत ५१ जागांसह निर्विवाद वर्चस्व आहे. या निवडी करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना तालुक्यांचा समतोल साधून निवडी कराव्या लागणार आहेत.

जिल्हा परिषदेच्या सत्तेत समतोल राखण्यासाठी राष्ट्रवादीकडून आतापर्यंत दौंड तालुक्याला अध्यक्षपद, आंबेगावला उपाध्यक्षपद, तर इंदापूरला गटनेतेपद देण्यात आले आहे. मात्र, विषय समित्यांच्या सभापतिपदांसाठी चुरस वाढली असून, २० हून अधिक सदस्यांनी दावेदारी सांगितली आहे. यामध्ये सर्वच्या सर्व जागा जिंकून देणाऱ्या मावळ तालुक्याला महत्त्वाचे पद मिळावे, अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांकडून जोर धरत आहे. आता जुन्याजाणत्यांना संधी मिळणार, की नव्या चेहऱ्यांना वाव मिळणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. इच्छुकांची संख्या पाहता ही निवड प्रक्रिया पक्षश्रेष्ठींसाठी मोठी कसरत ठरणार असल्याचे दिसत आहे.

कृषी, बांधकाम, समाजकल्याण आणि महिला व बालकल्याण या समित्यांचा ग्रामीण भागातील विकासकामांवर थेट प्रभाव असतो. त्यामुळे या मलईदार मानल्या जाणाऱ्या सभापतिपदांसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळत आहे. सभापतिपदाच्या शर्यतीत शांताराम इंगवले, करण खलाटे, विष्णू हिंगे, रुपाली झेंडे, डॉ. गायत्री खळदकर, विक्रम खुटवड, जितेंद्र बढेकर, मोनिका हरगुडे आणि छाया तांबे यांची नावे आघाडीवर आहेत. त्यांनी आतापासूनच वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे.




### दौंड, आंबेगाव शर्यतीतून बाहेर

**» दौंड तालुक्यातून खडकी जिल्हा परिषद गटाचे सदस्य वीरधवल जगदाळे यांना अध्यक्षपदाची, तर आंबेगाव तालुक्यातील पारगावतर्फे- अवसरी बुद्रुक जिल्हा परिषद गटाचे सदस्य विवेक वळसे पाटील यांना उपाध्यक्षपदाची संधी दिली आहे. त्यामुळे हे दोन तालुके आता शर्यतीतून बाहेर पडतील. भोरचे आमदार शंकर मांडेकर, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पुरंदरचे राष्ट्रवादीचे तालुकास्तरीय नेते यासाठी जोरदार मोर्चेबांधणी करीत असल्याने कोणाला लॉटरी लागणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**